**महाराष्ट्र शासन**

क्र. एनजीसी-१००१/नमवि/(०१/२००१)मशि-३
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १४ जुलै, २००१.

प्रति,
कुलसचिव,
अमरावती विद्यापीठ,
अमरावती

विषय : **कायम विना अनुदान तत्वावर नवीन महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत..**

संदर्भ : कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे पत्र क्र. अवि/८/सी-१५५०/२०००, दिनांक २७ डिसेंबर २०००.

महोदय,

आपल्या विद्यापीठामार्फत सन २००१-२००२ या शैक्षणिक वर्षासाठी नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांमध्ये **महिला उत्कर्ष प्रतिष्ठान, रिसोड, जि. वाशिम** या संस्थेस **शिरपूर (जैन), ता. मालेगांव, जि. वाशिम** या ठिकाणी कला अभ्यासक्रमाचे महाविद्यालयास परवानगी मिळण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. सदर प्रस्ताव विचारात घेऊन **महिला उत्कर्ष प्रतिष्ठान, रिसोड, जि. वाशिम** या संस्थेस **शिरपूर (जैन), ता. मालेगांव, जि. वाशिम** या ठिकाणी सन २००१-२००२ या शैक्षणिक वर्षापासून **कला** विद्याशाखेचे महाविद्यालय **कायम विना अनुदान तत्वावर** सुरु करण्यास स्थानिक उच्च शिक्षणाची मागणी विचारात घेऊन महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ मधील कलम ८२(५)च्या परंतुकानुसार पुढील अटींच्या अधिन मान्यता देण्यात येत आहे.

१) सदर संस्थेने कायम विना अनुदान तत्वावर महाविद्यालय चालविण्यास तयार असल्याबाबतचे हमीपत्र सादर केले नसल्यास सदर हमीपत्र संस्थेकडून घेण्यात यावे. संस्था हमीपत्र देण्यास तयार नसल्यास तसे शासनास कळवावे व शासनाचे आदेश विद्यापीठाने प्राप्त करुन घ्यावेत.

(कृपया मागे पहा.)

Principal
Late. Pundalikrao Gawali Arts &
Science Mahavidyalaya Shirpur (Jain)
Tq. Malegaon Dist. Washim 444504

Scanned by CamScanner

२) सदर महाविद्यालयास दिलेली मान्यता ही कायम विना अनुदान तत्त्वावर असून या महाविद्यालयास भविष्यात कोणत्याही प्रकारचे अनुदान किंवा आर्थिक मदत शासनाकडून देण्यात येणार नाही.

३) या महाविद्यालयास शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या आर्थिक बाबींसंबंधीची सर्वस्वी जबाबदारी स्वीकारणे संस्थेवर बंधनकारक आहे.

४) कायम विना अनुदान तत्त्वावर संस्थेस महाविद्यालय आर्थिकदृष्टया चालविणे शक्य व्हावे, यासाठी संस्थेने विद्यार्थ्यांकडून किती शुल्क आकारावे हे विद्यापीठाकडून मंजूर करुन घ्यावे.

२. सदर महाविद्यालयाने वरील सर्व बाबींची पूर्तता केल्यास त्या अधिन महाविद्यालयास संलग्नीकरण देण्याबाबत विद्यापीठाने कार्यवाही करावी व अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे तथा संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण यांना सादर करावा.

आपला,

(श्री. रा. जोशी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती
३. अध्यक्ष/सचिव, महिला उत्कर्ष प्रतिष्ठान, रिसोड, जि. वाशिम
४. मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. उप मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती/मशि-३

Principal
Late. Pundalikrao Gawali Arts &
Science Mahavidyalaya Shirpur (Jain)
Tq. Malegaon Dist. Washim 444504

Scanned by CamScanner